# सुधारीत वर्तवणूक नियमावली

**ऑर्किड स्कूल शी संबधीत सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी , सेवा कमर्चारी अथवा मानद सदस्य यांसाठी तात्काळ अमलात आणण्यासाठीच्या सूचना**

खालील सूचनांच्या आधारे आपले शाळेमधील वर्तन हे खाजगी आणि व्यावसाईक वर्तवणूकीच्या मार्यादांचे उल्लंघन करत नाही ह्याची दक्षता घ्यावी . कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन हे खपवून घेतले जाणार नाही ह्याची प्रत्येकाने नोंद घ्यावी. शाळेत असलेले सर्व विद्यार्थी अथवा विद्यार्थिनी कोणाशीही आपले वर्तन हे खालील मर्यादा ओलांडताना आढळल्यास त्यांच्यावर त्वरित आणि कठोर कारवाई करण्यात येईल

| योग्य वर्तन | अयोग्य वर्तन |
|---|---|
| काळजीने प्रेमाने किंवा कौतुकाने पाठ,किंवा खांदा अथवा हात थोपटणे | **खालील वर्तनास सक्त मनाई आहे.**<br>कुठल्याही विद्यार्थ्याला जवळ ओढून घेणे, हात घट्ट धरणे, मुका घेणे, कवटाळून धरणे, मिठी मारणे किंवा तशी विनंती करणे, मुलाला छातीशी धरणे, मांडीवर बसवणे, छाती, पोट, मांड्या, पार्श्वभागाला हात लावणे, किंवा पायावर बसवणे अथवा दोन पायांमध्ये धरणे व कुठल्याही प्रकारचा स्पर्श करण्यास सक्त मनाई आहे . |
| कुठल्याही प्रकारचे संभाषण हे शाळेतील वातावरणाला योग्य तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला पूरक ठरेल असेच असावे | **सक्त मनाई आहे.**<br>• अयोग्य विषयांवर विद्यार्थ्यांशी खाजगी संवाद साधणे अथवा त्यांना " हे आपल गुपित आहे" असे सांगून धमकावणे.<br>• शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी द्वयर्थी भाषा बोलणे, आवश्यकतेपेक्षा जास्त जवळीक साधणे खाजगी तसेच वैयक्तिक विनोद करणे, अथवा अशा प्रकारचे संवाद साधणे.<br>• छेड काढण्याच्या उद्देशाने संवाद साधणे किंवा प्रतिक्रिया देणे |
| शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे संबंध हे पूर्णतः शाळेतील उपक्रमांना साजेसे आणि योग्य असावे. | **सक्त मनाई आहे.**<br>शिक्षक व विद्यार्थ्याने शाळेतील कार्यक्रमांव्यतिरिक्त शिवाय संबंध ठेवणे, (एकत्र चित्रपट पाहणे, भोजन करणे, विशेष भेटी देणे, |

| | |
|---|---|
| | एकट्या विद्यार्थ्याला वाहनाने घरी सोडणे, गुप्तपणे चिठ्या लिहिणे) कुठल्याही प्रकारचे खाजगी संबंध ठेवणे. |
| विद्यार्थ्यांच्या गैरवर्तनाबद्दल त्यांच्याशी फक्त तोंडी संवाद साधणे. | **सक्त मनाई आहे.**<br>रागाच्या भरात मुलाला अपशब्द वापरणे उदा. " मूर्ख " किंवा तत्सम शब्दांनी संबोधणे, त्यांच्याशी कुचकट बोलणे किंवा त्यांच्या शारीरिक अथवा कौटुंबीक पार्श्वभूमीबद्दल बोलणे, त्यांच्या नाव अथवा आडनावाची चेष्टा करणे |
| Whole School Discipline Policy ( WSDP) नुसार विद्यार्थ्यांच्या गैरवर्तनाबद्दल त्यांच्या नोंदवही / डायरी मध्ये यादी केलेल्याच शिक्षांचेच पालन करावे. | **सक्त मनाई आहे.**<br>• वर्गाबाहेर शिक्षा म्हणून उभे करणे, किंवा बाकावर अथवा खुर्चीवर उभे करणे<br>• कुठल्याही प्रकारची शारीरिक शिक्षा करणे, विद्यार्थ्याचा हात घट्ट धरणे, खेचणे , ओढणे, डोक्यावर टपली मारणे अथवा कान पिळणे वा ओढणे, |

**कर्मचाऱ्यांची जबाबदारी**

1) एखाद्या कर्मचाऱ्याचे कुठल्याही प्रकारचे गैर वर्तन आढळल्यास त्याची मुख्याध्यापकांना तक्रार करणे
2) गैर वर्तनाबद्दल चर्चा न करता गुप्तता पाळणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.
3) कुठल्याही प्रकारची चर्चा व चेष्टा संबंधित विषयावर करू नये अथवा अफवा पसरू नयेत व बळी पडू नये.
4) कुठलीही तक्रार हि मुख्याध्यापक अथवा वरिष्ठ अधिकारी यांना प्रत्यक्ष सांगावी.

शाळेशी संबधीत कर्मचारी, किंवा अधिकारी यांपैकी कोणीही नैतीक अथवा कायदेशीर पातळीवर वरील नियमांचे उल्लंघन करू नये. एखाद्या विद्यार्थ्यास वा सहकाऱ्यास नैतीक शारीरिक व मानसिक पातळीवर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीत्या त्रास देताना आढळल्यास अशा कर्मचाऱ्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

**Namrata Majhail**
**Principal**
**The Orchid School**

**Lakshmi Kumar**
**Director**
**The Orchid School**